# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 466/2020** **दिनांक: 03 /06/2020**

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांचे पत्र क्र.जा.क्र. शा.वै.म.अ.स.रु./डयुटीमान्य/4123/2020 दिनांक 03.06.2020

## *आदेश*

**ज्या अर्थी**, महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि. 13 मार्च 2020 चे अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (कोव्हिड 19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपायोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यांत आली आहे.त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यामुळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहे . आणि.

**ज्याअर्थी,** अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांनी सद्यस्थितीतकोव्हीड संशयीत रुग्ण मोठया प्रमाणात निघतअसून त्यांचेकरिता वैद्यकिय सेवा देण्याकरिता तज्ञ मनुष्यबळाची कमतरता होत असून इंडीयन असोसियेशन, शाखा अकोलायांचे कडील औषधवैद्यक व बधिरीकरण तज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , प्राप्त अधिकारानुसार तसेच अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांनी कळविल्यानुसार तसेच त्यांनी दिलेल्या नियोजनाप्रमाणे, सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ नुसार वैद्यकिय अधिकारी यांच्या सेवा कोव्हीड-19 च्या उपचाराकरिता कोव्हीड कक्षामध्ये वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता याद्वारे आदेशीत करण्यात येत आहे.

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता, (1860 चा 45 ) याच्या कलम 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश **आज दिनांक 03 जून 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

सहपत्र- **परिशिष्ट —अ**

Office Of The District Magistrate AKOLA सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी —**

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला



NitinN 505

4. आयुक्त, महानगरपालिका अकोला
5. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त प्रमाणे नमूद अधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश निर्गमित करुन परिशिष्ट –अ प्रमाणे दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कामकाज करावे. व त्यांची दैनंदिन उपस्थितीबाबतची खातरजमा आपलेस्तरावरुन करण्यात यावी.
6. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. उपविभागीय अधिकारी अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. तहसिलदार अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
10. डॉ. ---------------------------------------- यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार तात्काळ अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांचेशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

Office Of The District Magistrate
सत्यमेव जयते
AKOLA

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**